# महाराष्ट्र विधानपरिषद
# दिवसाच्या कामकाजाचा क्रम
# मंगळवार, दिनांक २४ जुलै, २०१२
# (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**आदिवासी विकास मंत्री** : आदिवासी विकास विभागाने वित्त विभागाची पूर्व परवानगी न घेता आश्रमशाळेतील वस्तुंच्या खरेदी संदर्भात परिपत्रक काढल्याबाबत, या विषयावरील श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. व श्री. जगदीश गुप्ता, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १३९३० ला दिनांक ७ एप्रिल, २०११ रोजी सभागृहात अनुपूरक प्रश्नोत्तराच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

**क्रीडा व युवक कल्याण मंत्री** : "महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०१२" व "महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण २०१२" सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - असल्यास.**

**चार : लक्षवेधी सूचना - (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

**(१) (शुक्रवार दिनांक १३ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) -**

**सर्वश्री. रामनाथ मोते,** विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो गाणार, परशुराम उपरकर वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्य शासनाच्या वतीने इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन होणे, गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून

शिष्यवृत्ती मिळणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक विद्यार्थी गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीस पात्र असणे, गेल्या ३-४ वर्षातील शिष्यवृत्तीची रक्कम शासनाकडून प्राप्त होऊनही संबंधीत विद्यार्थ्यांना अदा न होणे, शिक्षण विभागातील कर्मचारी व अधिकारी यांनी आलेली रक्कम विद्यार्थ्यांना अदा न करता बॅकेतून काढणे व या निधीचा अपहार करणे, जिल्हा प्रशासनाने व वरिष्ठ कार्यालयाने पालकांच्या तक्रारीची दखल न घेणे, गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित ठेवणे, पालकांमध्ये व शिक्षकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

(२) **(शुक्रवार दिनांक १३ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) -**

**श्री. राजन तेली, वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्याच्या मत्स्यव्यावसायिकांना चालना मिळण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या योजनेतून देण्यात येणाऱ्या कर्जाचे प्रस्ताव मागील ४-५ वर्षापासून त्या-त्या वेळच्या किंमती प्रमाणे राज्य शासनामार्फत एनसीडीसी (पुणे) कार्यालयाकडे सादर झालेले असून मंत्रालयीन अधिकारी वर्गाच्या दप्तर दिरंगाईमुळे वर्षानुवर्षे सदर प्रकरणे प्रलंबित राहणे, तथापी नवीन किंमतीच्या निविदा देऊनही सदर प्रस्तावाची कर्जे मंजुर करताना गत ४-५ वर्षापूर्वीचे निविदामूल्यांप्रमाणे प्रस्ताव मंजूर करणे, परिणामी लाभार्थी मत्स्यव्यवसायी सहकारी संस्थाना अतिरिक्त स्वभांडवलातून प्रकल्प उभारणीसाठी खर्च करावे लागण्याची निर्माण झालेली गरज; सिंधुदुर्ग भद्रकाली मत्स्यव्यवसायी सहकारी संस्थेने नवीन निविदा सादर करुनही जुन्या दरानुसार कर्जे मंजूर करण्यात आल्यामुळे ४ ते ४.५ लाखाचा आर्थिक तोटा सोसण्याचा अलिकडेच निदर्शनास आलेला प्रकार, सदर मत्स्यव्यवसायिकांनी सहकारी संस्थांची आर्थिक परिस्थिती नसल्याने त्यांना प्रकल्प उभा करणे अश्यक्यप्राय होणे, राज्यातील सर्वच मत्स्यव्यावसायीक संस्थांना पुरेशा निधी अभावी प्रकल्प पूर्ण होणार नसल्याची निर्माण झालेली भीती, मत्स्यव्यावसायिकांमध्ये पसरलेला तीव्र संताप याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **(मंगळवार दिनांक १० जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) -**

**सर्वश्री. जयवंतराव जाधव,** अनिल भोसले, रमेश शेंडगे, हेमंत टकले, अरुण गुजराथी, सतीश चव्हाण, दिपकराव साळुंखे, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, **वि.प.स.**

पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्याचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सुकन्या ही योजना राबविण्याबाबत शासनाचा असलेल्या प्रस्ताव, या योजनेसाठी सुमारे ५०० कोटी रूपये खर्च प्रत्येक वर्षी अपेक्षित असणे, मुलगी जन्मल्याबरोबर तीच्या नावाने बँकेत अथवा विमा कंपनीकडे विशिष्ट रक्कम जमा करून मुलगी १८ वर्षाची झाल्यानंतर तीला १ लाख रुपये पुढील शिक्षणासाठी उपलब्ध करून देणेबाबत ही योजना असणे, मात्र ही योजना स्थगित करण्याचा शासनाने नुकताच घेतलेला निर्णय, राज्यातील मुलींचे प्रमाण कमी होत असलेच्या पार्श्वभूमीवर ही योजना तातडीने सुरू करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. दिवाकर रावते, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"म्हाडाने मे, २०११ मध्ये काढलेल्या घरांच्या सोडतीला मुंबईतील मालवणी मालाड येथील अल्प उत्पन्न गटातील २ हजार ६३२ घरांची किंमत प्रत्येकी २ लाख ४० हजार ५०० रुपयांनी आणि पवईमधील उच्च उत्पन्न गटातील ११० घरांची किंमत तब्बल १५ लाख रुपयांनी वाढविण्याचा निर्णय माहे मे, २०१२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास घेण्यात येणे, सदरहू उत्पन्न गटातील तयार घरांच्या किंमती वाढविण्याचा निर्णय अवास्तव असल्याने सदरहू सोडत विजेत्यांनी उक्त वाढीव रक्कम न भरण्याचा घेतलेला निर्णय, शासनाच्या या निर्णयामुळे सर्वसामान्य जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने फेर विचार करुन तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(५) **श्री. मोहन जोशी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शहरांची लोकसंख्या, आणि शहरातील सार्वजनिक वाहतुकीसाठी बसेसची संख्या याबाबत आंतरराष्ट्रीय मानकांप्रमाणे पुणे व पिंपरी चिंचवड या महानगरासाठी २५०० बसेस पेक्षा अधिक बसेसची आवश्यकता असताना पीएनपीएलकडे केवळ १७२० बसेस असणे, त्यातही मालकीच्या १४६० व भाडेतत्वावरील ३२७ बसेस असणे, वाहक चालकांअभावी त्यातील २०० बसेस रस्त्यावरच येत नसणे, सर्वसामान्यांना रिक्षांचे दर परवडत नसल्यामुळे पुण्यातील लोकप्रतिनिधीनी मिशन पीएमपीएल सुरु करणे, पीएमपीएलला तीन डेपोंची

आवश्यकता असून शासनाने अद्याप वाघोलीच्या डेपोसाठी केसनंद येथील गायरानाची जागा उपलब्ध करुन दिलेली नसणे, वाकडेवाडी येथे बजाज उद्यानाजवळ पीएमपीएलसाठी आरक्षित असलेली १० एकर जागा व सिंहगड रोडवरच्या डेपोसाठी आवश्यक जागा तातडीने उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, तसेच हिंजवडी येथील आयटी पार्कमध्ये देखील अडीच एकर जागेवर पीएमपीएलसासठी रिझर्वेशन असून सदरहू जागा देखील उद्योग विभागाने एमआयडीसी मार्फत एक रुपया नाममात्र भाडेतत्वावर तात्काळ देण्याची होत असलेली मागणी, विद्यार्थ्यांचे मोफत प्रवासाच्या पासचे पैसे दर तीन महिन्यांनी पीएमपीएलला देण्यात यावेत, पुणे दर्शनासाठी चार बसेस खरेदीची मान्यता स्थायी समितीने देवूनही अद्यापपर्यंत बसेस खरेदी करण्यात आलेल्या नसणे, पीएमपीएलचे तब्बल आठ कोटी ५३ लाख रुपये गृह विभागाने थकविले आहेत ते शासनाने त्वरित देण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

(६) **श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"परळी वैजनाथ जि.बीड येथील शंभर खाटांची सोय असलेल्या उपजिल्हा रुग्णालयात शहर व परिसरातील असंख्य रुग्ण उपचारासाठी नियमीत येत असणे, मात्र सदर रुग्णालयात वैद्यकिय अधिकारी तसेच अत्यावश्यक सोईसुविधांचा अभाव असणे, एक वर्षापासून कायमस्वरुपी वैद्यकिय अधिकारी नसणे, वैद्यकिय अधिकारी वर्ग १ व वर्ग २ ची ४ पदे रिक्त असणे, रुग्णलयात एकच स्त्री रोग तज्ञ कार्यरत असल्याने प्रसुतीसाठी येणाऱ्या महिलांची हेळसांड होत असणे, १ वर्षापासून रेडीओलॉजिस्ट नसल्यामुळे या रुग्णालयातील सोनोग्राफी व ई.सी.जी. मशिन बंद असणे, त्यामुळे रुग्णांची होणारी गैरसोय, या प्रकरणी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही आणि शासनाची भूमिका."

**पाच : विशेष उल्लेख सूचना - असल्यास -**

**<u>दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर</u>**

## ***दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत***

**सहा : म.वि.प.नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा -**

(१) **श्रीमती विद्या चव्हाण,** सर्वश्री.प्रकाश बिनसाळे, हेमंत टकले, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"भारतीय घटनेनुसार प्रत्येक स्त्री, शासन, समाज, जात व कुटुंब या सर्व पातळयांवर समान हक्कासाठी पात्र असून महिलांना बऱ्याच ठिकाणी संघर्ष करावे लागणे, कचरा गोळा करणाऱ्या, घरकाम करणाऱ्या व विट भट्टीवर काम करणाऱ्या महिला या संघटीत नसल्यामुळे त्यांचे होत असलेले शोषण, शहराची घाण कमी करणाऱ्या कचरा वेचणाऱ्या महिलावर्गाचे जागणे कठीण होवून बसणे, त्यांना समाजात हिनपणाची वागणूक मिळणे, कचरा वेचत असताना हातमोजे किंवा अन्य साहित्य त्यांचेकडे नसणे, त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम, भटक्या कुत्र्यांपासून त्यांना होत असलेला त्रास, सध्या राज्यात प्लास्टीकच्या पिशव्यांचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, कचरा गोळा करणाऱ्या महिला त्याकडे आकृष्ट होवून त्यांनी प्लॉस्टीकच्या पिशव्या गोळा करण्यामुळे या गंभीर समस्येवर मात होण्याची शक्यता, बचतगटाद्वारे गरीब व गरजू महिलांना कामे देण्यात येणे, त्यापैकी शालेय पोषण आहाराचे असलेले अत्यल्प अनुदान वाढविण्याचे तसेच बचतगटांच्या वस्तु विकण्यासाठी शासनाने बचत गटांना मॉलमध्ये बाजारपेठ मिळवून देण्याची नितांत आवश्यकता, राज्यातील बऱ्याच शाळा व महाविद्यालयात महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे नसणे, घरकाम करणाऱ्या असंघटीत महिलांना शासकीय सुविधा नसणे, त्यांच्या संरक्षणार्थ पोलीसांकडून उदासिनता असणे, समाजाकडून व कुटुंबाकडून महिलांना समानतेचा दर्जा न मिळणे, महिलांविरुध्दच्या अत्याचाऱ्याच्या गुन्ह्यात लक्षणीय वाढ होणे, बहूतांशी खाजगी आस्थापनेत महिला कर्मचाऱ्यांची होत असलेली छळवणुक व त्यांचे करण्यात येणारे शोषण, स्त्री हक्काची अंमलबजावणी अधिक चांगल्याप्रकारे करण्याची व महिलांचे सक्षमीकरण करण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री पाशा पटेल,** पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"राज्यात ब्रिटीश काळापासून चालू असलेली पिक आणेवारी काढण्याची पध्दत बदलण्याची आवश्यकता, त्यासाठी समिती गठीत करुन त्या समितीच्या सर्व सदस्यांनी पूर्ण शिवार फिरुन पिक आणेवारी काढणे व दरवर्षी १५ ऑक्टोबर पर्यंत जाहीर करणे, ही आणेवारी काढताना जमिनीचे तीन विभाग पाडून त्यात विविध १२ पिके कापून प्रयोग करण्यात येणे, १०X१० चे प्लॉट तयार करुन त्यातून मिळणारे उत्पन्न प्रति हेक्टर ठरविणे, प्लॉट निहाम महसूल विभाग, कृषि विभाग व पंचायत समिती असे तीन विभाग करणे, सद्य:स्थितीत शासनाकडून अशी कोणत्याही प्रकारची उपाययोजना करण्यात येत नसल्याने

प्रमाण उत्पन्न कमी येते, परंतु आणेवारीचे प्रमाण जास्त दाखविले जाते, या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांवर येत असलेले अर्थिक संकट व शासनाच्या विविध सवलती व लाभापासून वंचित राहण्याची त्यांच्यावर वेळ येणे, याबाबत शेतकऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, पिक आणेवारी पध्दती बदल करण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना, त्यावर शासनाची प्रतिक्रिया."

**सात : शासकीय विधेयके -**

**(अ) विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

**सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक १२ - महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१२.**

**(ब) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

**(१) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ५४ - महाराष्ट्र (विवक्षित मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावांत बदल करणे) विधेयक, २०११.**

**(२) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र अल्पसंख्यांक आयोग (सुधारणा) विधेयक, २०१२.**

**(क) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

**(१) सन २०११ चे वि.स.वि.क्रमांक ५० - महाराष्ट्र महानगरपालिका (चौथी सुधारणा) विधेयक, २०११.**

**(२) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ५५ - मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) व नागपूर शहर महानगरपालिका (निरसन) विधेयक, २०११.**

**(३) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ६७ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०११.**

**(४) सन २०१२ चे वि.स.वि.क्रमांक २० - मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१२.**

**(५) सन २०१२ चे वि.स.वि.क्रमांक २६ - मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन, हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) विधेयक, २०१२.**

आठ : **सर्वश्री विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.निलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, केशवराव मानकर, पाशा पटेल, डॉ.रणजित पाटील, श्री.नागो गाणार,

**वि.प.स. याचा म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव -**

"मुंबईतील शासकीय जागा विविध समाज उपयोगी कार्यासाठी कमी दरात लीजवर दिलेल्या असताना त्या संस्थांनी ह्या जागेचा वापर व्यावसायिक कारणासाठी करणे, सदर भूखंडाचा उपयोग व्यावसायिक कारणांसाठी होऊन देखील संबंधीत संस्थांनी ५० टक्के अनर्जित उत्पन्न शासनाकडे जमा न करणे, नगरविकास विभागाच्या सतत बदलत्या धोरणामुळे गिरणी कामगारांचा घराचा प्रश्न बिकट होणे, म्हाडाकडून होणाऱ्या भूखंड वाटपात मोठया प्रमाणात गैरव्यवहार होणे, नवी मुंबई सिडको मधील भूखंड घोटाळ्याप्रकरणी शंकरन समितीने अहवाल सादर करुन देखील, ह्या अहवालावर कारवाई न होणे, पुणे शहराजवळ सुस गावामध्ये ओकवुड गृहनिर्माण संस्थेने केलेल्या भूखंड घोटाळ्यासह अनेक भूखंड घोटाळे झाल्याचे उघडकीस येणे, महापालिका हद्दीबाहेर व एम.एम.आर.क्षेत्रामध्ये उभी राहिलेली अनधिकृत गोदामे, अनधिकृत बांधकामे वाढलेली असताना व याबाबत तक्रारी करुन देखील गृह विभागाकडून कोणतीही कारवाई न होणे, विजय पालांडे, लैला खान इत्यादीच्या प्रकरणात तपासामध्ये गृह विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होणे, मुंबई शहरामध्ये सी.सी.टी.व्ही.यंत्रणा बसविण्याचा निर्णय होऊनही शासनाने त्याबाबत चालढकलीचे धोरण स्वीकारणे, गृह विभागातील भ्रष्टाचारामुळे जनतेचा पोलीस दलावरील विश्वास डळमळीत होणे, नगरविकास, गृहनिर्माण व गृह या महत्वाच्या खात्यात असणाऱ्या भ्रष्टाचारामुळे अब्जावधी रुपयाचे शासनाचे झालेले नुकसान व त्यामुळे महाराष्ट्रातील कोट्यावधी जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष व याबाबत शासनाने करावयाची कारवाई विचारात घेण्यात यावी."

**नऊ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री. विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.**

"आळंदी ते पंढरपूर व देहूगांव ते पंढरपूर या पालखीमार्गाचे चौपदरीकरण करणेबाबत" या विषयावरील श्री. विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३२४६८ ला दिनांक ९ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री.जयवंतराव जाधव , वि.प.स.**

"नाशिक शहराला पाणीपुरवठा करण्याकरिता किकवी धरणाच्या स्त्रोतापासून पिण्याच्या पाण्याची योजना तयार करण्यास दिलेली मान्यता" या विषयावरील

श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक २७७८८ दिनांक १२ एप्रिल, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २३ जुलै, २०१२.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.